
पारावरच्या गप्पा

# रासायनिक खतांच्या किंमती वाढल्या...



**नि**त्यनियमाप्रमाणे संपत देवदर्शन आटोपून पारावर गणपतची वाट पाहात होता. गणपतही देवदर्शन घेऊन संपतजवळ येऊन बसत म्हणाला, ''संपा, आज मला पिकांना खत द्यायचे आहे. परंतु समजत नाही कोणती खतं घ्यावी ते! काल दुकानात गेलो होतो. सर्वच खतांच्या किंमती एवढ्या वाढल्या की मी काल खतंच विकत घेतली नाहीत. फक्त युरिया विकत घेतला आहे. आता मला वाटतंय फक्त युरियावरच भागवावं म्हणून! कारण एकतर शेती उत्पादनाला म्हणावा तसा दर मिळत नाही. त्यात पुन्हा हवामानाचं काहीच खरं राहिलं नाही. कायम हवामान खराब होतंय आणि त्यासाठी फवारण्या करण्याचा खर्च वाढलाय. लाईटचं तर काहीच खरं नाही. आली तर आपली, नाही तर पाणी देण्याचा प्रश्न आहेच. हे एवढं कमी झालं म्हणून की काय, त्यात आता रासायनिक खतांच्या किंमती भरमसाठ वाढल्यात. म्हणून मी ठरवलंय, यावर्षी फक्त युरिया खतावरच भागवायचं म्हणून.''

यावर मात्र संपत गंभीर होऊन हसत म्हणाला, ''अरं गंपा, तू तर फारच मोठी चूक करायला निघालास बघ. म्हणजे तुला जे स्वस्त मिळेल ते तू वापरणार. उद्या तुला कोणी विष फुकट किंवा स्वस्त दिलं तर तू घेशील काय? फक्त युरियाचा वापर करून तू जमीन, पिकं आणि तुझं नुकसान करून घेशील बघ''

यावर मध्येच संपतला अडवून गणपत म्हणाला, ''तुला काय म्हणायचंय, युरिया काही विष आहे काय? एवढी वर्षे आपण वापरतोय युरिया. पिकाला त्याचा फायदा होतोच ना? तू म्हणतो युरिया विष आहे तर मग शासनाने युरिया विकायला का परवानगी दिली? मला तर तुझे हे पटले नाही बघ. मी अडाणी आहे म्हणून तू मला काहीही सल्ला देऊ नको. युरिया स्वस्त आहे, त्याचा फायदा पिकांना होतोय, युरिया विकत घेण्यासाठी जीवघेणी स्पर्धा करावी लागते, अनेकदा युरियाची कमतरता असेल त्यावेळी नको त्यांचे पाय धरावे लागतात. आज सर्वांच्या आवडीचे खत युरिया आणि तू म्हणतो की स्वस्त मिळते म्हणून मी युरिया घेतोय. तू युरियाला विष म्हटले हे मात्र मला पटले नाही बघ संपा.''

आता मात्र संपत गंभीर होऊन गणपतला सांगू लागला, ''हे बघ गंपा, युरिया हे नक्कीच पीक उत्पादन घेण्यासाठी महत्त्वाचे खत आहे, हे मलाही माहीत आहे. परंतु तू आताच म्हणाला की, फक्त युरिया खताचाच वापर करून पीक उत्पादन घेणार आहे. यामुळे मी तुला म्हणालो की, स्वस्त असेल तर तू विष घेशील काय? याचा अर्थ गंपा, पिकाचे उत्पादन घेण्यासाठी फक्त

युरियाचा वापर करणे योग्य नाही. आपल्याकडे हरितक्रांती झाली त्यावेळी सुरुवातीला युरिया तसेच अमोनियम सल्फेट या खतांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात होता. तसेच इतरही मिश्र खते ज्यामध्ये स्फुरद, पालाश यासारखी खतेही नंतरच्या काळात वापरली गेली. शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा वापर करणे अनिवार्य झाल्यानंतरच्या काळात खतांच्या किंमती वाढत गेल्या. खतांच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र शासनाने हजारो कोटी रुपयांचे अनुदान देण्यास सुरुवात केली. तरीही युरिया खत शेतकऱ्यांच्या गळ्यातील ताईत झाले. सर्व रासायनिक खतांची निर्मिती आणि त्यांच्या किंमती यावर शासनाचे निर्बंध होते. म्हणजे खतांच्या किंमती शासन ठरवत होते. खत कंपन्यांची विक्रीची किंमत- तसेच शासनाने ठरविलेली किंमत यामधील जो फरक होता, तो शासनाकडून खत कंपन्यांना अनुदान म्हणून दिला जात होता. परंतु मागील २५-३० वर्षांपूर्वी शासनाने इतर खतांच्या किंमतींवरील निर्बंध उठविले आणि खतांच्या किंमती ठरविणे तसेच विक्री करण्याचे अधिकार खत कंपन्यांना दिले. त्यामुळे मिश्र खतांच्या किंमती ठरविण्यामध्ये शासनाचा कोणताही सहभाग नाही. शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार युरिया म्हणजेच नत्र खताचा वापर फारच मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे जमिनीची प्रत ढासळली आहे. पिकांची जोमदार वाढ होत असल्यामुळे रोग-किडींचा प्रादुर्भाव वाढतो. त्यांचे नियंत्रण करण्यासाठी शेतकरी रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करतो. या सर्वांचा परिणाम म्हणजे माणसांना उपलब्ध होत असलेल्या अन्नधान्यामध्ये रसायनांचा अंश जास्त असतो. जमिनीतील पाण्यामध्येही नायट्रेटचे प्रमाण वाढते आहे. या सर्व बाबींचा विचार करून शासनाने युरिया खतावरील निर्बंध काढले नाहीत. आजही युरिया उत्पादन, त्यांच्या किंमती ठरविणे आणि विक्री यामध्ये शासनाचे अनेक निर्बंध आहेत. यावरून लक्षात घे गंपा, की मी युरियाला विष का म्हटले आहे ते! विषापासून देखील मानवी आरोग्याच्या दृष्टीने काही उत्पादने तयार केली जातात. परंतु यामधील विषारी अंश जास्त प्रमाणात शरीरात गेला तर त्यामुळे प्रसंगी आपला मृत्यूसुद्धा होऊ शकतो. याचा विचार करूनच आपण युरियाचा वापर जपूनच केला पाहिजे.''

आता मात्र गणपतच्या चेहऱ्यावर काही वेगळेच प्रश्नचिन्ह तयार झाले होते. तो म्हणाला, ''हे बघ संपा, तू म्हणाला तसं सर्व खरं असेल तर शासनाला हे का कळत नाही की शेतकरी युरियाचा जास्त वापर करतात आणि इतर मिश्रखते जसे स्फुरद, पालाश या खतांचा कमी वापर करतात? तर याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या किंमती! आताच बघ ना- युरिया स्वस्त आणि इतर खते महाग. यातून तुला वाटत नाही का मिश्र खतांचा वापर कमी होऊन युरिया खताचा वापर वाढेल म्हणून? मी युरियावरच भागवत होतो. परंतु तू मला माहिती दिल्यामुळे त्यातील काही बाबी मला कळल्या. सर्व शेतकऱ्यांना याचे ज्ञान आणि माहिती नसल्यामुळे ते सुद्धा युरियाच जास्त वापरतील. मी काल दुकानात बघत होतो की, शेतकरी इतर खताच्या किंमती बघून युरियाची जास्त मागणी करीत असतील. रासायनिक खतांच्या किंमती वाढवीत असताना युरिया खताच्या किंमती वाढविणे गरजेचे आहे; कारण इतर खतांच्या किंमती वाढल्या तर शेतकरी केंद्र शासनावर नाराज होऊन त्याचा राजकीय फटका बसेल असे सर्व पक्षांना वाढत असल्यामुळे सर्वसाधारणपणे युरियाच्या किंमती वाढविण्याची जबाबदारी कोणत्याही राजकीय पक्षाचे सरकार घेत नाही. याचमुळे अनेक अन्नद्रव्यांमध्ये नत्र अन्नद्रव्ये सर्वात स्वस्त आहेत. आता तूच बघ ना, रासायनिक खतांमधील स्फुरद, पालाश ही अन्नद्रव्ये आधीच महाग आणि आता त्यात परत मोठी वाढ झाली. यामुळे या महत्त्वाच्या अन्नद्रव्यांचा वापर कमी होणार, युरियाचा वापर वाढणार, युरियावर केंद्र सरकार अनुदान देत असल्यामुळे त्याच्या अनुदानामध्ये कपात केल्यास युरियाचे उत्पादन कमी होऊन युरियाचा पुरवठा कमी होणार. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतकरी आणि शेतीचे (जमिनीचे) अतोनात नुकसान होणार. या चक्रव्यूहामध्ये आपण अडकत असताना आणि हे सर्वांना समजत असतानाही; यातून बाहेर पडण्याची किंवा यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्याची मानसिकता कोणाकडेही दिसत नाही, ही

बाब खरोखरच अतिशय क्लेशकारक आहे. खरं तर संपत असं त्रागा करून कधी बोलत नाही परंतु आज त्याच्या बोलण्यामुळे गणपतही हळहळला आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, ''जाऊ दे संपा, नको विचार करू एवढा. एक सर्वात महत्त्वाची बाब तू सांगितली ती माझ्या पक्की लक्षात बसली बघ. आता स्वस्तात विषही मिळाले तर मी घेणार नाही आणि महाग मिळते म्हणून गुणधर्माचा विचार करता त्याचा वापर करणेही टाळणार नाही! सरकारला आपल्या शेतकऱ्यांचे काही देणे घेणे राहिले नाही बघ. कांदा, सोयाबीन, कापूस महाग झाले तर आयात- निर्यात धोरण बदलतात. कंपन्या तसेच ग्राहक सरकारवर दबाव आणून त्याच्या किंमती कमी करण्यास भाग पाडतात. आपण मात्र कृषिप्रधान देशाचे शेतकरी साधी एखादी मागणी सरकार दरबारी मांडून मान्य करून घेऊ शकत नाही. बघ ना- मागील तीन-चार वर्षांपासून दुधाचे दर २० ते २५ रुपये आहेत आणि खर्च मात्र ३० रुपयांच्या पुढे गेला. सोड आता हा विषय. जास्त विचार केला तर वाईट विचार येतात डोक्यात. त्यापेक्षा चांगला आणि पॉझिटिव्ह विचार करायचा आता. खतांच्या किंमती वाढल्या ना तर आता 'स्मार्ट शेतकरी' होऊन कमीतकमी प्रमाणात तसेच योग्य वेळी, योग्य खतांचा वापर करायचा. ठिबकमधून खतांचा वापर करून तसेच पानांद्वारे खताचा वापर करून आपण खतांची बचत करू. शेतातील काडीकचरा न जाळता त्याचे शेतातच सेंद्रिय खत करू. या सर्व बाबी तूच मला सांगितल्या होत्या. परंतु मी जास्त मनावर घेतले नाही. परंतु आजपासून या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून त्याचा अवलंब करण्यासाठी प्रयत्न करणार. अर्थात यासाठी तुझे मार्गदर्शन पाहिजे बघ संपा. कारण भविष्यात खतांच्या किंमती आपल्या हातात नाहीत. परंतु तू सांगतो त्याप्रमाणे खतांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन आणि संतुलित वापर केला तर नक्कीच कमी खतांमध्येही आपण चांगले उत्पादन घेऊ शकतो. मग यामध्ये युरियाचा जास्त वापरही करण्याची गरज पडणार नाही.''

गणपतच्या या बोलण्यावर संपत हसून म्हणाला, ''अरे वा रे माझ्या पठ्ठ्या. फारच शहाण्यासारखा बोलायला लागलाय बघ आज तू! चल याबद्दल मी तुला स्पेशल चहा पाजतो.''

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**

■

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**